# प्रेसनोट

ला.प्र.वि,वाशिम.

दि.०३/०९/२०२६

आरोपी १) आलोसे सुनिल भानुदास ताले वय–४२ वर्षे पदः– पोलीस हेडकान्स्टेबल पो.स्टे.मंगरुळपीर ता.मंगरुळपीर जि.वाशिम यांचे तसेच २) आरोपी खाजगी ईसम विजय चंदु चव्हाण वय–३२ वर्षे रा.गिंबा पो.मोहरी ता.मंगरुळपीर जि.वाशिम यांनी तक्रारदार यांना दोषरोपत्र पाठविणे असल्याने झेराक्स काढणे करीता दि.०३/०९/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान २०००/– रु लाच मागणी केली. दि.०३/०९/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे पोहेकॉ सुनिल ताले यांचे वतीने आरोपी खाजगी ईसम विजय चव्हाण याने २,०००/–रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | १) आलोसे सुनिल भानुदास ताले वय–४२ वर्षे पदः– पोलीस हेडकान्स्टेबल पो.स्टे. मंगरुळपीर ता.मंगरुळपीर जि.वाशिम यांचे तसेच २) आरोपी खाजगी ईसम विजय चंदु चव्हाण वय–३२ वर्षे रा.गिंबा पो.मोहरी,ता.मंगरुळपीर जि.वाशिम |
| लाच स्विकारल्याची रक्कम | २,०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे मुलाने दिलेल्या फिर्यादवरुन दाखल गुन्हयात दोषारोपत्र पाठविणेकरीता २,००० रु मागीतले व सापळा कारवाई दरम्यान आरोपी क्र.०२ याने २,०००रु स्विकारले. |
| सापळा अधिकारी | श्रीमती सुलभा राउत,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

गुन्हयाची हकीकत अशाप्रकारे आहे की, दि.०३/०९/२०२६ रोजी यातील तक्रारदार यांनी १)गैरअर्जदार पोहेकॉ सुनिल टाले व विजय चव्हाण,खाजगी ईसम हे तक्रारदार यांचे मुलाने दिलेल्या फिर्यादवरुन दाखल गुन्हयात दोषारोपत्र पाठविणेकरीता २,०००/–रू लाचेची मागणी करत असल्याबाबत तक्रार दिली.

सदर तक्रारीची शासकीय पंचासमक्ष पडताळणी दि.०३/०९/२०२६ रोजी केली असता कार्यवाही दरम्यान तक्रारदार त्यांचे मुलाने दिलेल्या फिर्यादवरुन दाखल गुन्हयात दोषारोपत्राची झेराक्स काढणे करीता २,०००/–रू लाचेची मागणी करून त्याचदिवशी लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.०३/०९/२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान पो.स्टे.मंगरुळपीर येथे नमुद आलोसे पो.हे.कॉ. सुनिल टाले यांनी २०००/– रुपये लाच रक्कम तक्रारदार यांना खाजगी ईसम विचय चव्हाण यांचे कडे देण्यास सांगीतली वरुन विजय चव्हाण यांनी आलोसे सुनिल ताले यांचे वतिने २०००/– रु लाच रक्कम स्विकारली. यावरून आरोपी क्र.०२) विजय चव्हाण यांना सदर गुन्हयात ताब्यात घेण्यात आले. त्यांचे कडुन लाच रक्कम २,०००/– रु हस्तगत केली. आरोपी क्र.०१) पोहेकॉ सुनिल टाले यांना सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांचे वर शंका आल्याने फरार झाले.

दोन्ही आरोपी विरुध्द कलम ७,७ A भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ व बिएनएस कलम २६२ व २८१ प्रमाणे विरुध्द पो.स्टे.मंगरुळपीर, जि. वाशिम येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक, श्री बापू बांगर, अपर पोलीस अधिक्षक श्री सुनिल किनगे, अॅन्टीकरप्शन ब्युरो अमरावती, यांचे व पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधिक्षक श्री जगदिश परदेशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम यांचे मार्गदर्शनात तपास अधिकारी सुलभा राउत,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.वाशिम, सापळा पथकातील कर्मचारी पोहवा विनोद मारंकडे,समाधान मोघाड, मो.मुब्बशिर ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टीकरप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनीक्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक–९९२२०६११२३ यावर संपर्क साधण्याचे आवाहन सुलभा राउत,पोलीस निरीक्षक अॅन्टीकरप्शन ब्युरो, वाशिम यांनी केले आहे.

(सुलभा राउत)

पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.